ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

URA

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

**EDITOR IN CHIEF**
**Dr. BALAJI KAMBLE**

IMPACT FACTOR
1.0086

ISSN -2229-4406

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

औ- २९३

URA

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Vol. - V, Issue - XI
Year - VI (Half Yearly)
Sept. 2015 To Feb. 2016

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

**Price : ₹ 200/-**

## CHIEF EDITOR

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

## EXECUTIVE EDITORS

**Dr. Suhas Avhad**
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. D. Raja Reddy**
Chairman, International Neuro Surjery
Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

**Dr. E. Siva Nagi Reddy**
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

**Dr. A. H. Jamadar**
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
College,Chakur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Yu Takamine**
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

**Scott A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

## DEPUTY-EDITOR

**Dr. Balaji S. Bhure**
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Babasaheb M. Gore**
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

## CO-EDITORS

**Dr. V.J. Vilegave**
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

9

# भारतीय संविधानातील सामाजिक व आर्थिक तरतुदींचा अभ्यास

अरुण चांगदेव खर्डे
अर्थशास्त्र विभाग,
शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय,
परंडा, जि. उस्मानाबाद

Research Paper - Economics

**प्रस्तावना**

जाती व गरीबी या भारतीय समाजातील सामाजिक व आर्थिक अशा दोन मुख्य समस्या आहेत. या बाबींचा उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाचा मसुदा पूर्ण झाल्यावर २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेसमोर दिलेल्या भाषणामध्ये केला. जाती व गरीबी या केवळ सामाजिक व आर्थिक समस्याच नाहीत तर देशाची समृद्धी व विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. जरी गरीबी जगातील इतर देशात असली, तरी भारताबाबत ही सर्वात वेगळी आहे. मानवाधिकाराबाबत नैसर्गिक व भौतिक स्त्रोत त्यात जमिन, संपत्ती, उद्योगधंदे इ.वर मालकी हक्क व नियंत्रण ठरविण्याचे कार्य संविधान करीत असते. २६ जानेवारी १९५० ला संविधान लागु झाल्यानंतर स्वातंत्र्य, समता व बंधूता ही तत्वे अंमलात आली. जाती व्यवस्थेचे निर्मुलन, गरीबीचे उच्चाटन, सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून समता, स्वातंत्र्य व बंधूता ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संविधानामध्ये तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. परंतु या तरतूदींची अंमलबजावणी पूर्णपणे राबविली जात नाही म्हणून बहुसंख्य जनता मानवाधिकारापासून वंचित आहेत व त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास झालेला दिसत नाही.

भारतीय संविधानातील कलम ३४०, ३४१ व ३४२ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार तयार केलेल्या सूचीत समाविष्ट करण्यात आलेल्या जनसमूदायांना इतर मागासवर्गीय, अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती म्हणतात. त्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती हा समाज अजून आर्थिक

व सामाजिक बाबतीत मागासलेला दिसतो. इतरांकडून त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. भाषा, वंश, धर्म, जीवनशैलीचा विचार करता त्यांच्यात इतरांपेक्षा वेगळेपणा दिसतो. संविधान म्हणजे मुलभूत नियमांचा संग्रह होय. देशाचा सर्वोच्च कायदा होय. संविधानानुसार देशाचा राज्य कारभार चालला तरच राज्यातील व्यक्तींचे जीवन सुखी व समाधानी होईल. संविधानामुळेच या देशातील व्यक्तींना समान अधिकार मिळालेले आहेत. परंतु सर्वांनाच सर्वच बाबतीत आपले अधिकार मिळत नाहीत. प्रत्येकाला अधिकार आहेत परंतु कायद्याचे पालन होत नाही.

**उद्देश -**

१) मानवाधिकाराच्या समस्येचे अध्ययन करणे.

२) मानवाधिकारासंबंधी असणाऱ्या संविधानात्मक तरतूदींची अध्ययन करणे.

३) सर्व समाजात, सर्वच क्षेत्रात व सर्वच स्थरात संविधानात्मक समान अधिकार मिळतात काय? याचे अध्ययन करणे.

४) मानवाधिकारासंबंधी उपाययोजना सूचविणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत विषयांवर संशोधन करतांना दुय्यम तथ्यांचा उपयोग केलेला आहे. ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**गृहीतके -**

१) मानवाधिकाराचा उपयोग होतांना दिसत नाही.

२) संविधानातील तरतूदींचा उपयोग सर्वसामान्यांना होत नाही. म्हणून अधिकारापासून ते वंचित आहेत.

३) संविधानातील कायदे प्रामाणिकपणे राबविले जात नाहीत.

४) संविधानातील कायद्यातून पळवाटा शोधल्या जातात.

**मानवाधिकार व संविधान -**

भारतात जातीभेद, श्रेष्ठ-कनिष्ठता, गरीब-श्रीमंत, जमिनदार-भूमिहीन असे अनेक भेद होते. त्यासाठी समानता हे तत्व भारतीय परिस्थितीतूनच निर्माण झाले आहे. त्यासाठीच भारतीय संविधानेत पुढील कलमांच्या आधारे समानता प्रस्थापित करण्यात आली आहे.

कलम १४ कायद्यापुढे समानता -

भारताच्या संविधानातील तरतुदीनुसार सर्व नागरीक कायद्यापुढे समान आहेत. राज्याचे कायदे सर्व नागरीकांना समान लागु होतील. त्याबाबतीत जात, धर्म, वंश या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

**कलम १५ भेदभावास बंदी -**

धर्म, वंश, लिंग, जात किंवा जन्मस्थान यावरून भेदभाव करण्यास मनाई संविधानाच्या या तरतूदीत करण्यात आलेली आहे. वरील कारणांवरून कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारू शकणार नाहीत. उदा. उपहारगृहे, सार्वजनिक विहीरी व तलाव सर्वांसाठी खुले राहतील.
कलम १६ सार्वजनिक सेवायोजनांच्या बाबींमध्ये समान संधी -

भारतीय प्रत्येक नागरीकाला आपल्या पात्रतेनुसार नोकरी करण्याचा समान अधिकार आहे. त्यात धर्म, जात, वंश, स्त्री-पुरुष, जन्मस्थान व निवासस्थान या आधारावर कोणालाही नेमणूकीपासून वंचित केले जाणार नाही. तसेच संविधानातील तरतूदीनुसार अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवता येतात.

**कलम १७ अस्पृश्यता नष्ट करणे -**

भारतीय संविधानाने स्पृश्य-अस्पृश्य असा व्यक्ती-व्यक्तींमध्ये भेदभाव करणे कायद्याने गुन्हा ठरविला आहे. अस्पृश्यता हा भारतीय समाज व मानवजातीला लागलेला कलंक असल्याने तो मिटविला गेला पाहिजे.

**कलम १८ किताब नष्ट करणे -**

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारकडून वेगवेगळ्या पदव्या दिल्या जात. त्यामुळे नागरीकांमध्ये भेद तयार होत होता. किताब देण्यास बंदी केल्यामुळे भेदभाव न होता सर्वांना समान संधी मिळत आहे.

**कलम २१ शिक्षणाचा हक्क -**

भारतीय संविधानातील शिक्षणाच्या हक्कामुळे प्रत्येक समाजात जागृती आली. शिक्षणामुळे नवीन व्यवसाय आले. नोकरीत संधी मिळाली. त्यातून सामाजिक प्रगती झाली. व्यावसायिक, सामाजिक, स्थानिक गतिशीलता साध्य झाली. नविन तंत्रज्ञानाचा स्विकार गतिशीलतेला संधी प्राप्त झाली.

**कलम २३ मानवांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई -**

पूर्वी भारतीय समाजात गुलाम म्हणून व्यक्तींची खरेदी-विक्री होत असे. गुलाम म्हणून श्रीमंत व्यक्ती त्यांच्या ईच्छेविरुद्ध काम करवुन घेत असत. देशातील कोणत्याही व्यक्तीची खरेदी-विक्री करणे, त्यांच्या ईच्छेविरुद्ध काम करवुन घेणे, दारिद्र्य आणि जातीव्यवस्था अशा आर्थिक व सामाजिक कारणांमुळे देशाच्या अनेक भागांमध्ये वेठबिगार सक्तीची मजूरी प्रथा प्रचलित होती. संविधानाने याविरुद्ध संरक्षण दिले असले तरी उपासमार व दारिद्र्यामुळे अशा प्रकारची सक्तीची कामे करवून घेतली जातात. यातच मानवाधिकारापासून समाज वंचित झालेला दिसतो.

**कलम २४ बालकांना कामास ठेवण्यास मनाई -**

१४ वर्षाखालील कोणत्याही बालकाला कारखान्यात किंवा खाणीत नोकरीस ठेवण्यास किंवा अन्य धोक्याच्या कामावर अशा मुलांची योजना करण्यास या कलमाने बंदी घातली आहे. परंतु गरीबांचे शोषण कमी होण्यास हा अधिकार असला तरी फटाके, आगपेट्या या उद्योगात बालमजूरांचा वापर केला जातो.

**कलम २९ अल्पसंख्यांक वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण -**

भारताच्या कोणत्याही प्रदेशात राहणाज्या नागरीकास स्वतःची भाषा, संस्कृती असेल तर तिचे जतन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**कलम ४५ मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद -**

संविधान लागू झाल्यापासून १० वर्षाच्या कालावधिच्या आत सर्व बालकांना त्यांच्या १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

संविधानातील वरील तरतूदी पूर्णपणे राबविल्या जात नाहीत. म्हणून समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानवाधिकारापासून वंचित रहावे लागते. न्याय, स्वातंत्र्य आणि समता हे संविधानाचे महत्वपूर्ण अंग आहे. भारतामध्ये पूर्वीपासूनच भाषावाद, प्रांतवाद, जातियवाद, धर्मवाद होते. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य निर्मितीस अडचणी येत असत. म्हणूनच बंधूत्वाची भावना निर्माण करण्यासाठी ऐक्याच्या मार्गातील अडचणी दूर केल्या. राष्ट्राचे ऐक्य व अखंडता साध्य व्हावे व मानवी जीवन समृद्ध व्हावे हा संविधानाचा प्रमुख उद्देश आहे. अशी समाजव्यवस्था निर्माण झाली तरच मानवाला माणूस म्हणून जगता येईल. अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी भारतीय शासनावर आहे. शासनावरील ही जबाबदारी भारतीय संविधानाने टाकलेली आहे.

**उपाययोजना -**

१) संविधानातील तरतूदींप्रमाणे सर्वांनाच समान मानवाधिकार दिला गेला पाहिजे.
२) आर्थिक व सामाजिक विषमता कमी होण्यासाठी संविधानातील तरतूदी पूर्णपणे अंमलात आणणे गरजेचे आहे.
३) सर्व व्यक्तींसाठी समान अधिकार आहेत याची जाणीव जागृती होणे आवश्यक आहे.
४) संविधानातील तरतूदींचे योग्य पालन केले जाऊन त्यासंबंधी जनजागृती घडवून आणणे.
५) शासकीय स्तरावरून संविधान वाचन ग्रामसभेत होत राहणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष -**

१) संविधानात्मक तरतूदी असल्या तरी आजही मानवाधिकाराच्या बाबतीत आर्थिक विकास झालेला दिसत नाही.
२) संविधान काय आहे? हेच बहुसंख्य जनतेला माहित नाही.

३) संविधानातील तरतूदीनुसार आपला हक्क व अधिकार आहे याची जाणिव समाजाला नाही.

४) मानवाधिकारासंबंधी जनतेच्या मनात अज्ञान आहे म्हणून संविधानातील तरतूदींचे योग्य पालन होतांना दिसत नाही.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह घटना समितीतील सर्वच सदस्यांचा उद्देश आज प्रत्यक्षात उतरतांना दिसत आहे, परंतु अधिकाराबाबत प्रत्यक्ष उपयोगात येत नाही.

६) जनतेच्या विकास मार्गात सामाजिक व आर्थिक समस्या उभ्या आहेत. त्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक व शासकीय स्तरावर सकारात्मक व ठोस उपाययोजना करून संपूर्णपणे अंमलात आणण्याची आवश्यकता आहे.

भारतीय समाज व्यवस्थेतील विषमता, जातीभेद नष्ट करण्याकरीता अनेक प्रकारच्या चळवळी कार्यान्वित झालेल्या होत्या. परंतु त्या फारशा प्रभावी ठरल्या नाहीत. यात मुख्यतः भगवान बुद्ध यांची समता दृष्टी करूणेवर आधारलेली आणि प्रत्यक्ष आचारधर्म ठरलेली धम्माची चळवळ महत्वाची ठरली. नंतर हजार वर्षांनी समाज सुधारकांची कृतीशील वैचारीक चळवळ उदयास आली. त्यात महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजश्री शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमातून चळवळ उभी राहीली. देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तिनंतर संविधानाचा मसूदा तयार करण्याची जबाबदारी डॉ. आंबेडकरांवर आल्याने त्यांनी दलित, आदिवासी, स्त्रिया यांना पूरक होईल व हा वर्ग शोषणमुक्त होईल या उद्देशाने संविधान तयार केले. या संविधानातील तरतूदींमुळे शोषित, अन्यायग्रस्त वर्गाचा विकास होत आहे, हे मात्र निश्चित आहे. याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे जाते. हजारो वर्षाचे या वर्गाचे स्वप्न त्यांनी लेखणीद्वारे साकारलेले आहे. तरी सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संविधानाच्या अंमलबजावणी बाबत साशंक होते. म्हणूनच संविधान समितीच्या समारोपाच्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले होते, संविधान कितीही आदर्श असले तरी ते राबविणारे जर प्रामाणिक नसतील तर त्याचे वाईट फळे समाजाला भोगावी लागतील. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी विविध संविधानात्मक तरतूदींची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होतांना दिसत नाही म्हणून संविधानाच्या अधिकारापासून बहुसंख्य जनता वंचित आहे हे स्पष्टपणे मांडावे लागते.

## संदर्भ सूची

१) नेरकर संदिप, डॉ. तुंटे विजय - भारतीय संविधान, भाग-१, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव

२) भारताचे संविधान - संचालक, मुद्रण व लेखन सामुग्री महाराष्ट्र शासन, भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित केले २००७.

३) डॉ. पाटील वा.भा. - भारतीय राज्यघटना, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.